|| गुरू मायरुप ||

सृष्टी उत्पत्ती, क्षणिक लय, काया मोहर, वृद्धत्व क्षय ।
नियम सम, नाही भेदाभेद, इथे पंचप्राण, तिथे पंचतत्व ॥

वाहिले काय, भोगीले काय, मोहमाया सल, अभेद्य वलय ।
उमजे तोवरी, विलंब अतीव, साध्य निसटोनी, निरास विषय ॥

त्यात मतीहीन, वाचा बेसूर, कार्य कर्तव्य, उहापोह सूर ।
मार्ग दावण्यास, सांगाती अभाव, ध्येय दावणीस, उदरार्थ यत्न ॥

कलीकळा जोर, अधिक प्रहार, हाती अपयश, व्यय प्रयास ।
दशदिशा धूसर, साद कोणास, सारेच गर्क, काल प्रभाव ॥

केवळ मात्रा, कलीस मार, गुरू एकचि, भक्तांसी आधार ।
फिरो ग्रहमान, फिरो भाग्य, गुरुरुप रक्षण, जळले अभाग्य ॥

आम्हासाठी राखा, गुरुराज श्रेष्ठ, सुटले मिटले, जे जे क्लिष्ट ।
पतित असुनी, मिरवी पुनीत, गुरुप्रताप, युगेयुगे मिरवीत ॥

संपल्या निमाल्या, व्यथा क्लेश, जन्मांचे फिटे, प्रारब्धपाश ।
व्यर्थ नोहे, गुरू स्मरण, मुक्तीचा दाता, गुरू मायरुप ॥

- सद्गुरू दासोहं

© सपु, www.saarthbodh.com

– सचिन कुलकर्णी